**उल्हासनगर महानगरपालिका, मालमत्ता कर विभाग**

ULHASASNAGAR MUNICIPAL CORPORATION, PROPERTY TAX DEPT.

मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Head Office, Ground Floor,Ulhasangar-४२१ ००३ Dist Thane, Maharashtra

Tel No:- ९५२५१-२७२०११६ /१२५ Ext. No. २३८ Fax No:- ९५२५१-२७२०१०४

जा.क्रं. उमपा/क.वि/यु.-४/७१/२८

दिनांक२७/०२/२०२५

विषय : उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्रं. २७बीओ००४६८८३०० या मालमत्तेवर श्री परशुराम वामन कांबळी अशी नोंद पूर्ववत करणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्रं.२७बीओ००४६८८३०० या मालमत्तेवर **श्री प्रदीप परशुराम कांबळी** अन्वये करण्यात आलेली आहे.

**करपात्र बाबींचा क्षेत्रफळा चा तपशिल पुढीलप्रमाणे**

| Const Type | Occu Status | Usage | Amount Rent | Asst. Year | Total Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|
| AC SHEET BRICKS | OWNER | NON RESI | 0 | 04/01/1986 | 973 | 973 |
| OPEN | OWNER | RESI | 0 | 04/01/1986 | 5287 | 5287 |
| AC SHEET BRICKS | OWNER | RESI | 0 | 04/01/1986 | 2248 | 2248 |

**विषयांकित मिळकतीकरीता खालीलप्रमाणे नाव हस्तांतर करण्यात आलेले आहे.**

**मुद्दा क्रं. (१)** जा.क्रं. उमपा/करवि/यु.४/७२०/१२ दिनांक २५/०२/२०१३ रोजी नाव हस्तांतर अर्ज दाखल करण्यात पारित करण्यात आला असून महानगरपालिका कर आकारणी नोंद वहीत मालमत्ता कर भरण्यास प्रथमत: पात्र व्यक्ती म्हणून **श्री प्रदीप परशुराम कांबळी** अशी नोंद करण्यात आली आहे.

**मुद्दा क्रं. (२)** तद्नंतर **श्री अजयसिंग साजनसिंग लबाना** पत्ता- बॅ.नं. ११४ समोर, फॉलवर लाईन, स्वामी संत्संग हॉल, उल्हासनगर ३. यांनी टोकन क्रं. ४१२०२४००००८१४२ दिनांक २०/०३/२०२४ अन्वये हरकत दाखल केली आहे.

**मुद्दा क्रं. ३** मिळकतीच्या आक्षेप/हरकतीच्या अनुषंगाने दिनांक २४/०५/२०२४ रोजी मा. उप आयुक्त (कर) यांच्या दालनात झालेल्या सुनावणी दरम्यान मा. उप आयुक्त (कर) यांनी **Sandeep Parshuram Kambli & Others** या नावे जारी करण्यात आलेले **Deed Of Convevance Dt.** ३१/०८/२००१ ची पडताळणी करून सर्व मालमत्ताधारकांची माहिती घेणेबाबत निर्देश दिले होते.

**मुद्दा क्रं. ४** सदर निर्देशानुसार कर विभागामार्फत जा. क्रं. उमपा/कर विभाग/यु४/२३ दिनांक २७/०६/२०२४ व दिनांक ०५/०८/२०२४ नुसार प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत तथा उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचे कार्यालयास **Deed Of Convevance Dt.** ३१/०८/२००१ मधील सर्व मालमत्ताधारकांचा तपशिल मिळणेबाबत कळविण्यात आले होते.

**मुद्दा क्रं. ५** प्रशासक उल्हासनगर शहर वसाहत तथा उप विभागिय अधिकारी, उल्हासनगर ३ यांनी पत्र क्रं. उपविअ/भुखंड/सी-३/कावि-२१२/जा.क्रं.१०७५ दिनांक ११/०९/२०२४ नुसार मुळ सनद व सनद नकाशा आढळ होत असून त्यानुसार SDO/Plot/C-३/CDR ९० Dt. ३१/०८/२००१ श्री संदीप परशुराम कांबळी व इतर यांचे नावे यु नं. २२३ व २२३ब, शिट नं. २५ उल्हासनगर ३ क्षे. १९३०.८/९ चौ.वार यांचे नावे सनद निर्गमित केल्याचे कळविले आहे.

**मुद्दा क्रं. ६** उप विभागिय अधिकारी, उल्हासनगर ३ यांचेकडून प्राप्त झालेल्या CD व सदर आक्षेप/हरकतीचे अनुषंगाने पूर्नसुनावणी दिनांक १७/०१/२०२५ रोजी दुपारी १२:३० वा. कर निर्धारक व संकलक यांचे दालनात ठेवण्यात आली होती परंतु प्रशासकिय कारणास्तव सदर सुनावणी रद्द करण्यात आली आहे.

त्यानंतर पुन्हा दिनांक ३०/०१/२०२५ रोजी दुपारी १:१५ वाजता कर निर्धारक व संकलक यांचे दालनात पुर्नसुनावणी ठेवण्यात आली होती.

सदर सुनावणी दरम्यान अर्जदार **श्री अजयसिंग साजनसिंग लबाना व गैरअर्जदार — श्री. प्रदीप परशुराम कांबळी, श्री मयुर एस कांबळी, श्रीम. दिपाश्री दिनकर ढवळ,** हे उपस्थित होते.

तसेच **श्री अजयसिंग साजनसिंग लबाना** यांनी दिनांक ३०/१२/२०२४रोजी सुनावणी दरम्यान संबधित मालमत्ता क्रं. २७बीओ००४६८८३०० अन्वये नोटरी केलेले खरेदी खत सादर केलेली आहे.

विषयांकित प्रकरणी संबधित कर निरिक्षक यांनी दिनांक ०२/०१/२०२५ रोजी संदर्भित मिळकतीची प्रत्यक्ष पहाणी केली असून कर निरिक्षकाचा अहवाल पुढीलप्रमाणे सादर केला आहे.

१) सद्यस्थितीत मालमत्ता क्रं. २७बीओ००४५५६८८३०० या मिळकतीचा ताबा श्री प्रदीप परशुराम कांबळी यांचेकडे दिसून येत आहे.

२) मनपा कर आकारणी पुस्तकात मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमतः पात्र व्यक्तीचे नावाची नोंद करण्यात येते.सदर नोंदीचा मालकी हक्काशी काहीही संबंध नाही. सदर नोंद अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे करण्यात येते. परंतु सदरची कागदपत्र खरी की खोटे याची पडताळणी करणे मनपा कार्यक्षेत्रात येत नाही.

तरी CD वरी वारसांचे वारस दाखले मागविणेकरीता व तोपर्यंत उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता क्रं. २७बीओ००४५५६८८३०० करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र व्यक्ती म्हणून श्री परशुराम वामन कांबळी ही नोंद पूर्ववत करणेसाठी प्रस्ताव पुढील आदेशार्थ सादर करण्यात येत आहे.

श्री अजयसिंग साजनसिंग लबाना यांनी दाखल केलेली हरकत संबधित कर निरिक्षक यांनी सादर केलेला कार्यालयीन अहवाल पहाता विषयांकित प्रकरणी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) उक्त बाबी विचारात घेता उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत नावाची नोंद करणेकरीता जागेच्या मालकी हक्का संदर्भात संबधितांनी सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करून संबधित जागेच्या मालकीबाबत वारस दाखला आदेश प्राप्त करून घ्यावेत, तदनंतर नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

२) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत मालमत्ता क्रं. २७बीओ००४५५६८८३०० करीता मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र व्यक्ती म्हणून **श्री परशुराम वामन कांबळी** अशी नोंद पूर्ववत करण्यात येत आहे.

(निलम चंद्रकांत कदम)
कर निर्धारक व संकलक
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत :

१) श्री अजयसिंग साजनसिंग लबाना, बॅ.नं. १११४ समोर, फॉलवर लाईन, राधास्वामी संत्संग हॉलजवळ, उल्हासनगर ३.
२) श्री. प्रदीप परशुराम कांबळी, आशादिप बिग बाजार समोर, जवाहर टॉकीज जवळ, उल्हासनगर ३.
३) श्री मयुर एस कांबळी, युनं. १५३ चालता नं. २२२, २२३ (बी) शीट नं. २५, उल्हासनगर ३.
४) श्रीम. दिपाश्री दिनकर ढवळ, ऐशमुख वाडी, रूम नं. ११६, शंकर मंदीर समोर, सेक्टर १, नवि मुंबई ४००४०८.
५) कर निरिक्षक युनिट क्रं. ४, उल्हासनगर महानगरपालिका.